कोर्ट विद्यमान श्री सचिन कुमावत, तहसिलदार हिंगणा यांचे महसूल न्यायालय, हिंगणा

रा.मा.क्र.०७ /एन.ए.पी.-३४ (सनद)/२०२४-२५
मौजा- **टाकळघाट** प.ह.नं. **७८**,
तालुका-हिंगणा, जि. नागपूर

# परिशिष्ट "ब"

## महाराष्ट्र जमिन महसूल संहीता १९६६ चे कलम ४२ अ मधील तरतूदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाची

## सनद

( पारीत दिनांक**२७सप्टेबंर २०२४**)

ज्याअर्थी अर्जदार श्री आनंद केवलरामजी चुरड व इतर २, रा. नागपूर यांनी **मौजा-टाकळघाट**, प.ह.नं. ७८ येथील ख.क्र. ५९ आराजी २.०६, हे.आर. आर म्हणजेच २०६००.०० चौ.मी. या जमीनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ अ च्या तरतुदीन्वये **निवासी** अकृषक प्रयोजनार्थ सदर जमीनीचा विकास सहाय्यक संचालक,नगर रचना, नागपूर यांचे अंतिम मंजूरी अहवाल क्र. अकृषीक/ मौ.टाकळघाट/ ता.हिंगणा/ ससंनाग/ १४२० दिनांक २५.०३.२०१० अन्वये विकास परवानगी प्राप्त केली आहे. ज्यासंबधी नियोजन प्राधीकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत सलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| AREA STATEMENT | | | |
|---|---|---|---|
| | TOTAL LAND AREA ON KH ON | २०६००.०० | SQ.M |
| | AREA UNDER LAY-OUT | २०६००.०० | SQ.M |
| | AREA UNDER PLOT | १२९६२.०४ | SQ.M |
| | AREA UNDER AMENITY SPACE | २३३०.२९ | SQ.M |
| | AREA UNDER OPEN SPACE | २१५८.७१ | SQ.M |
| | AREA UNDER | ३१४८.९६ | SQ.M |

आणि ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटदाराने शासनाने, उक्त संहीतेच्या कलम ४७ अनुसार देय रुपांतर कराची व नमुद निवासी अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकुण क्षेत्रफळ २.०६ हे. आर. म्हणजेच २०६०० चौ मीटरला १० पैसे प्रति चौ.मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रूपये २०६०/- ग्रामपंचायत सेस कर अकृषक करा एवढा रू.२०६०/- जिल्हा परिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या १४४२०/- परावर्तीत कर अकृषक साऱ्याचे ५ पट म्हणजेच रू. १०३००/- असे एकुण रक्कम रूपये २८८४०/-आकारणी निर्धारित होत असून चालान क्र. MH००८६३५५५० २०२४२५M दिनांक २४.०९.२०२४ रोजी शासन खजिना दाखल केलेली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहीते मधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत रेखांकन/मंजुरअभिन्यास नकाशा परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेला निवासी अकृषिक वापरापोटी उक्त सहिंतेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी :उक्त जमिनीच्या भोगवटदारास उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक ३१ जुलै, २०२४ रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये ०.१० प्रती चौ. मी. प्रमाणे रूपये २०६०/- यादराने परीगणित होणारी

वार्षिक आकारणी देईल अशी उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये तहसिलदार कडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारीत आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३) वरील प्रमाणे मंजुर रेखांकन/ मंजुर अभिन्यास नकाशा वापरा मध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकारणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करुनये व ही सनद निर्गमीत झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराचे क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरणकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत तहसिलदार यांना देणे भोगवटदारा वर बंधनकारक राहिल.

४) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्ती पैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास तहसिलदार यास, उक्त संहितेच्या अन्वये तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अन्वये जी भरण्यास उपयोग करतादायी असेल अशी इतर कोणत्याही शास्ती सबाधान आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावरआणि कलम ३२९ च्या पोटकलम (२) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमिन भोगवटादार यांच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

५) सदर जमिनी या नागरी जमीन कमाल धारणा व कोर्ट ऑफ वार्डस् मध्ये बाधित होत असल्यास सदर अकृषक आकारणी रद्द करण्यात येईल.

६) ज्या प्रयोजनार्थ अकृषक सनद निर्गमित करण्यात आलेली आहे त्याखेरीज इतर वापर अनुज्ञेय होणार नाही.

७) सहाय्यक संचालक,नगर रचना, नागपूर यांचेकडील पत्र क्र अकृषक/ मौ.भानसोली (किन्ही)/ ता.हिंगणा/ सरनाग/ १४८३ दिनांक २७.०४.२०१० मध्ये दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे जमिन मालक/विकासकास बंधनकारक राहील.

८) अभिन्यास नकाशामध्ये नमुद मोजमापे, क्षेत्रफळ इत्यादी परिगणने मध्ये कोणत्याही चुका आढळल्यास त्यासंदर्भाने अभिन्यासास सुधारित मंजूरी घेणे आवश्यक राहील.

९) भविष्यात जागेबाबत वाद उपस्थित झाल्यास सदरची अकृषक सनद/अकृषक आदेश रद्द समजण्यात येईल.

१०) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने उप अधिक्षक, भुमी अभिलेख, हिंगणा यांचे कडून मोजणी करून घेणे बंधनकारक राहिल त्यानंतरच सदर सनद प्रभावी होईल.

त्यांची साक्ष म्हणुन तहसिलदार, हिंगणा या तहसिलदार अधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यावतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक२७/०९/२०२४ रोजी आपली सही केली आहे.

(भोगवटदाराची स्वाक्षरी)

( आनंद केवलरामजी चुरड)

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) ----------

श्री. प्रशांत सेवकराम गावंडे

ब) ----------

श्री. प्रशांत केवलरामजी चुरड

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) ----------

श्री. प्रशांत सेवकराम गावंडे

ब) ----------

श्री. प्रशांत केवलरामजी चुरड

आम्ही असे जाहिर करतो की, ज्याने सनदे वर स्वत: श्री आनंद केवलरामजी चुरड यांनी स्वाक्षरी केली, ती व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहिती प्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्यांनी या ठिकाणी आमच्या समक्ष आपली स्वाक्षरी केलेली आहे .

(सचिन कुमावत)
**तहसिलदार**,हिंगणा

प्रतिलीपी : -

१ **मा जिल्हाधिकारी, नागपूर** यांना माहितीस सविनय सादर.

२. **मा उपविभागीय अधिकारी, नागपूर(ग्रा)** यांना माहितीस सविनय सादर.

३ **उपअधिक्षक, भुमि अभिलेख, हिंगणा** यांना माहितीस तथा सदरहू मंजूर नकाशा नुसार फक्त अकृषक आकारणी करण्यात आलेली असून सदरहू प्रकरणात कमी जास्त पत्रक तयार होणे आवश्यक आहे.तरी सदरहू अकृषक आकारणी आदेशाचे अनुषंगाने कमी जास्त पत्रक तयार करणे करिता अग्रेषित.

४ **सह दुय्यम निबंधक, हिंगणा** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

५ **तलाठी सा.क्र**. 78, **मौजा-टाकळघाट, ता. हिंगणा** यांना माहितीस तथा मंजूरी नकाशाचे अनुषंगाने उपअधिक्षक,भुमी अभिलेख, हिंगणा यांचेकडून कमी जास्त पत्रक प्राप्त झाल्यानंतरच सदर अकृषक आकारणीच्या आदेशानुसार नोंद राजस्व अभिलेखात घ्यावी.

६ **वबान शाखा, तहसिल कार्यालय, हिंगणा** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

७ **अर्जदार श्री. आनंद केवलराम चुरड व इतर**, रा. नागपूर यांना माहितीस तथा उपरोक्त अटी व शर्तीच्या पूर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी अग्रेषित.

**तहसिलदार**,हिंगणा

तहसिलदार
हिंगणा